ePaper
| वर्ष - 6 । अंक - 135 | UDYAM-MH-26-0158827 |
महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | । सोमवार । दिनांक 22 ऑगस्ट 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# केजरीवाल-सिसोदियांचा 'पवार पॅटर्न'; अंगावर आलेल्या 'ईडी'ला शिंगावरच घेतलं



## आतील पानांत


- दारुधंदे तेजीत ; पोलीस मजेत?
- गुड न्यूज : पवना धरण १०० टक्के भरले!
- "देवेंद्र फडणवीस भाजपा-सेना युतीचे मुख्यमंत्री होणार"


### 'पीपीपी' तत्वावर बहुमजली पार्कींग करणार

# कार पार्किंगसाठी आता पैसे!

### पिंपरी आणि चिंचवडमध्ये पार्कींगचे नियोजन

**पिंपरी।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**शहरातील गर्दीची ठिकाणे असणाऱ्या पिंपरी भाजी मंडई, क्रोमा शो - रूम आणि चिंचवड रेल्वे स्टेशन या तीन ठिकाणी अद्ययावत असे बहुमजली पार्कींग करण्यात येणार आहे. सार्वजनिक-खासगी भागिदारी (पीपीपी) तत्वावर हे पार्कींग उभारण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणावर पार्कींगची सोय होणार आहे.**

पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या सुमारे २५ लाख असून वाहनसंख्या १६ लाखाच्या पुढे आहे. नागरिक विविध कारणांसाठी मोठ्या प्रमाणात आपल्या वाहनाने ये - जा करत असतात. हे करताना वाहनांचे पार्किंग योग्य ठिकाणी करणे हा दिवसेंदिवस एक जटील प्रश्न बनला आहे. औद्योगिकनगरी म्हणून नावलौकीक असणारे पिंपरी - चिंचवड हे झपाट्याने वाढणारे शहर आहे. शहराचा विकास साधत असताना लागणाNया पायाभुत सुविधा, दळणवळण व्यवस्था, वाहतुक व्यवस्था, आरोग्य, रस्ते, पाणीपुरवठा, मलनि:सारण व्यवस्था, उद्याने, जलतरण तलाव, मैदाने, वाहनतळ व्यवस्था यासारख्या अनेक बाबी महापालिकेला नागरिकांच्या सोयीसाठी कराव्या लागतात.

महापालिका हद्दीत दिवसेंदिवस वाढत्या लोकसंख्येच्या मानाने वाढत्या वाहनांसाठी पार्कींगची सोय करणे अतिशय गरजेचे आहे. त्यासाठी १ जुलै २०२१ पासून 'पे अॅण्ड पार्वÂ' ही योजना रस्त्यांवर काही प्रमुख ठिकाणी सुरू करण्यात आली. तरीही पार्कींगचा प्रश्न शहरात जटील बनला आहे. त्यामुळे



| ठिकाण | क्षेत्रफळ (चौ.मी.) | पार्कींग प्रकार |
|---|---|---|
| जुनी भाजी मंडई, पिंपरी | ५६०० | रॅम्प |
| क्रोमा शो-रूमजवळ, पिंपरी | २४८७ | रॅम्प |
| चिंचवड रेल्वे स्टेशजवळ | ३९१० | रॅम्प |

शहरात गर्दीच्या ठिकाणी प्रायोगिक तत्वावर वाहनतळ उभारणे ही बाब प्रशासनाच्या विचाराधीन होती. त्यासाठी महापालिकेच्या वाहनतळ आरक्षित जागांची अतिरिक्त आयुक्त यांच्यासमवेत प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. त्यामध्ये प्रामुख्याने पिंपरी उड्डाणपुलाजवळील जुन्या भाजी मंडईजवळ, पिंपरीतील क्रोमा शो-रूम जवळ आणि चिंचवड रेल्वे स्टेशनजवळ जागा उपलब्ध आहे.

या तीनही ठिकाणी अद्ययावत असे बहुमजली पार्कींग व्यवस्था करणे शक्य होणार आहे. याशिवाय या जागा वाहनतळ आरक्षणाच्या असून महापालिकेच्या मालकीच्या आहेत. या ठिकाणी सार्वजनिक-खासगी भागिदारी (पीपीपी) द्वारे बहुमजली पार्कींग व्यवस्था करता येणे शक्य आहे. ही तीनही ठिकाणे अतिशय गर्दीची असून त्याठिकाणी पार्कींग व्यवस्था केल्यास नागरिकांची मोठ्या प्रमाणावर पार्कींगची सोय होणार आहे. तसेच वाहतुक कोंडीचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत होईल. वाहन चालकांना शिस्त लागेल. तसेच महापालिका उत्पन्नातही भर पडेल. यासाठी तज्ञ सल्लागारामार्पÂत या जागेचा पार्कींग आराखडा आणि सविस्तर विनंती प्रस्तावही (आरएफपी) तयार करण्यात आला आहे.

# घंटागाडीने वेळ चुकविल्यास चालकावर कारवाई!

### आरोग्य प्रमुखांचा आदेश : तक्रारींचा निपटारा काढण्याचा प्रयत्न

**पिंपरी चिंचवड।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

शहरातील अनेक भागात घंटागाडी वेळेवर पोहचत नाहीत.कधी सकाळी तर, कधी दुपारी येते. या संदर्भात अनेक तक्रारी आहेत. घंटागाडीवर व्हेईकल ट्रॅकिंग सिस्टीम आणि जीपीएस यंत्रणेद्वारे २४ तास नजर ठेवण्यात येणार आहे. नेमलेल्या वस्ती आणि कॉलनीमध्ये वेळेवर घंटागाडी नसल्याचे




आढळून आल्यास आरोग्य विभागाकडून चालकांवर कारवाई केली जाणार आहे. महापालिकेचे सन २००९ मध्ये घंटागाड्यांना जीपीएस यंत्रणा बसवली होती. त्याचे नियंत्रण केवळ क्षेत्रीय कार्यालयांमधून होत आहे. वाहने कुठे आहेत, कोणत्या गल्लीमधून गेली आहेत, याबाबतची माहिती कर्मचाNयांचे पर्यवेक्षक आणि क्षेत्रीय कार्यालयामध्ये समजत होती.त्यामुळे तक्रारी आल्या तरी त्यांचे निरसन वेळेत होत नव्हते. घंटागाडी वेळेवर येत नसल्याच्या नागरिकांसह लोकप्रतिनिधींच्या वाढत्या आणि नियमित तक्रारी आहेत. त्यासाठी आता सर्व घंटागाड्यांना आरोग्य विभागाच्या वतीने व्हेईकल ट्रॅविंâग सिस्टीम बसवण्यात येणार आहे.त्या माध्यमातून ते वाहन कुठे आहे, याची माहिती मिळते.त्यासाठी आता डॅश बोर्ड विकसित करण्यात येणार आहे.

... तेथे घंटागाडी पाठविणार : ढाकणे

काही भागातून कचरा उचलला नसल्याच्या तक्रारी येतात. तसेच, घंटागाडी वेळेवर येत नसल्याच्या तक्रारी आहेत. त्या तक्रारी सोडविण्यासाठी घंटागाड्यांवर २४ तास नजर ठेवण्यात येणार आहे. या प्रणालीच्या माध्यमातून एका भागामध्ये किती वेळा घंटागाडी जाते की जातच नाही, याची माहिती उपलब्ध होणार आहे.ज्या भागात घंटागाडी जात नाही, तेथे ती पाठविली जाईल, असे अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे यांनी सांगितले.

# दारुधंदे तेजीत ; पोलीस मजेत ?

## आमदार सुनील शेळके आक्रमक: कामशेत पोलीस ठाण्यावर मोर्चा

वडगाव मावळ ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

अवैध धंद्यांवर तातडीने कारवाई करावी. तसेच अवैध धंद्यांना पाठीशी घालणाऱ्या कामशेत पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांची तातडीने बदली करण्यात यावी, या मागणीसाठी मावळचे आमदार सुनिल शेळके व स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष रमेश साळवे यांच्या नेतृत्वाखाली आज (रविवारी) सकाळी कामशेत पोलीस ठाण्यावर मोर्चा काढण्यात आला होता. जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख यांनी संबंधित पोलीस निरीक्षकावर कारवाईचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

कामशेत पोलीस ठाण्याच्या हद्दीत ठिकठिकाणी सुरू असलेल्या अवैध दारुधंद्यांवरून गोळा केलेल्या गावठी दारुसह राष्ट्रवादी कॉंग्रेस व स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी कामशेत पोलीस ठाण्यावर मोर्चा काढला होता.

### आम्हाला भक्षक नको रक्षक हवा..

**आम्हाला रक्षक पाहिजे भक्षक नको. सर्वसामान्य नागरिक तसेच कार्यकर्ते व लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी अवैध दारुधंद्यांबाबत तक्रारी करून देखील कामशेत पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध दारुधंदे राजरोसपणे सुरू आहेत. याचाच अर्थ या पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक त्यांना पाठीशी घालत आहेत. ही खूप गंभीर बाब असून अशा पोलीस अधिकाऱ्याची तातडीने येथून बदली करावी व चांगल्या पोलीस अधिकाऱ्याची नेमणूक करावी, अशी आग्रही मागणी आमदार शेळके यांनी केली.**

तालुक्यातील गुन्हेगारी वाढण्यासाठी कारणीभूत असलेल्या अवैध दारूच्या धंद्यांना पाठीशी घालणाऱ्या पोलीस निरीक्षकाची बदली होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याची आक्रमक भूमिका आमदार शेळके यांनी घेतली. त्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पुणे-मुंबई महामार्गावर रास्ता-रोको आंदोलन करण्याचा इशाराही शेळके यांनी यावेळी दिला होता.

मावळ तालुक्यात कोथुर्णे येथे झालेल्या दुर्दैवी घटनेतील मुलीवर अत्याचार करून खून करणारा आरोपी व्यसनाधीन होता. त्यामुळे असे अवैध दारुधंदे कायमस्वरूपी बंद करण्याची मागणी आपण अधिवेशनात केली होती. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात कामशेत परिसरात मिळालेल्या गावठी दारूचे कॅन नेऊन अवैध दारू धंद्याच्या विरोधात आवाज उठवणार असल्याचा इशाराही शेळके यांनी दिला.



संबंधित पोलीस निरीक्षकावर दोन दिवसांत कारवाईचे आश्वासन जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख यांनी दिल्यानंतर आमदार शेळके यांनी आंदोलन स्थगित करीत असल्याची घोषणा केली. अवैध दारुधंद्यांच्या विरोधात आपली लढाई चालूच राहील, त्यासाठी यापेक्षा तीव्र जनआंदोलन केले जाईल असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. यावेळी रमेश साळवे, विठ्ठलराव शिंदे, ॲड.रूपाली दाभाडे, महिला कॉंग्रेस तालुकाध्यक्ष दिपाली गराडे यांनी मनोगत व्यक्त केली. पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मार्केट यार्डात वाहतूक कोंडी करणाऱ्या किरकोळ विक्रेत्यांवर कारवाई!

## शेतकरी आणि ग्राहकांच्या वाहनांना होत होता अडथळा

पुणे ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

मार्केट यार्डातील घाऊक बाजारात बेकायदा किरकोळ लिंबे तसेच फळे विक्री करणाऱ्या विक्रेत्यांच्या विरोधात बाजार समितीकडून आज (रविवार) कारवाई करण्यात आली. बाजार आवारात किरकोळ विक्रेत्यांमुळे वाहतूक कोंडी होत होती.

श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात गेल्या काही वर्षांपासून लिंबू आणि फळांची किरकोळ विक्री करण्यात येत आहे. किरकोळ विक्रेत्यामुळे बाजारातील वाहतुकीस अडथळा होत असल्याने १०० किरकोळ विक्रेत्यांच्या विरोधात कारवाई करण्यात आली, असे बाजार समितीचे प्रशासक मधुकांत गरड यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. बाजार समितीचे सचिव राम घाडगे, अतिरिक्त सचिव नितीन रासकर, फळे भाजीपाला विभाग प्रमुख बाबासाहेब बिबवे, कांदा बटाटा विभाग प्रमुख दत्ता कळमकर, अडते संघटनेचे अध्यक्ष अनिरुद्ध भोसले, सचिव करण जाधव, माजी अध्यक्ष विलास भुजबळ, अमोल घुले, कामगार संघटनेचे अध्यक्ष संतोष नांगरे आदी उपस्थित होते.



गेल्या काही वर्षांपासून बाजार आवारात लिंबांची किरकोळ विक्री करण्यात येत होती. घाऊक बाजारात किरकोळ विक्रेत्यांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण झाला होता. शेतकरी आणि ग्राहकांच्या वाहनांना अडथळा होत होता. तीमाल घेऊन येणाऱ्या वाहनांना बाजारात जागा उपलब्ध होत नव्हती. त्यामुळे वाहतूक कोंडी होत होती. अडते संघटनेसह बाजार घटकांनी बाजार आवारातील किरकोळ विक्रेत्यांच्या विरोधात कारवाईची मागणी केली होती, असे गरड यांनी सांगितले.

# गुड न्यूज : पवना धरण 100 टक्के भरले!

## यावर्षी समाधानकारक पाऊस : पिंपरी-चिंचवडकरांची चिंता मिटली

**।पिंपरी। ।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

पिंपरी- चिंचवड शहरासह मावळ वासियांची तहान भागवणाऱ्या पवना धरण परिसरात पावसाचे पुनरागमन गेल्या आठवड्यात झाले व आठवडाभर चांगल्या पावसामुळे आज सकाळी धरण 100 टक्के भरले आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेने पाणीसाठा 3.11 टक्के जास्त आहे. शनिवारी दिवसभरात सकाळपासून ते आज सकाळी सहा वाजेपर्यंत 9 मिलिमीटर पाऊस झाला.

तसेच, आज सकाळपर्यंत एकूण 2166 मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. गेल्या वर्षी आजच्या तारखेपर्यंत झालेला एकूण पाऊस 2059 मिमी होता. त्यामुळे 107 मिमी पाऊस यावर्षी आजपर्यंत जास्त झाला आहे. तसेच, आजचा पाणीसाठा 100 टक्के आहे. गेल्या वर्षी आजच्या तारखेचा धरणातील पाणीसाठा 96.81 टक्के होता. त्यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेने आजचा पाणीसाठा 3.11 टक्के जास्त आहे.

### पवना धरणातील परिस्थिती...

- गेल्या 24 तासात झालेला पाऊस : 9 मिमी.
- 1 जूनपासून झालेला पाऊस : 2166 मिमी.
- गेल्या वर्षी आजच्या तारखे पर्यंत झालेला एकूण पाऊस : 2059 मिमी.
- धरणातील सध्याचा पाणीसाठा : 100.00 टक्के
- गेल्या वर्षी आजच्या तारखेचा धरणातील पाणीसाठा : 96.89 टक्के
- गेल्या 24 तासात पाणीसाठ्यात झालेली वाढ : 0.02 टक्के
- आजची पाण्याची आवक: 3.39 द. ल. घ. मी
- आजपर्यंत पाण्याची आवक: 259.88 द. ल. घ. मी
- धरणतील पाण्याचा उपयुक्त पाणीसाठा : 240.97 द. ल. घ. मी
- धरणतील पाण्याचा एकूण पाणीसाठा : 272.11 द. ल. घ. मी
- धरणातील पाणी पातळी: 613.26 मीटर



पिंपरी चिंचवड शहारासह मावळ तालुक्यातील विविध गावांचा पाण्याचा मुख्या स्रोत पवना धरण आहे. महापालिका सध्या धरणातून 510 एमएलडी पाणी उचलते. शहरला पाणीपुरवठा करण्यासाठी पवना नदीवरील रावेत – पुनावळे दरम्यान असलेल्या बांधऱ्यातून अशुद्ध जलउपसा करण्यात येतो. सेक्टर 23 निगडी येथे पाणी शुद्ध करून शहवासियांना पाणी पुरवठा केला जातो.

# चिखली-घरकुलमध्ये येथे दहीहंडी उत्साहात !

## प्रेक्षकांची तुफान गर्दी : सामाजिक कार्यकर्ते निलेश नेवाळे यांचा पुढाकार

**पिंपरी। ।**
**महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**चिखली घरकूल वसाहत येथे निलेशदादा नेवाळे सोशल फाउंडेशन व शिवरक्त प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक कार्यकर्ते निलेशदादा नेवाळे यांच्या नेतृत्वाखाली घरकुल येथे शुक्रवारी (दि.19) मोठ्या प्रमाणात दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला. ही दहिहंडी मुंबई येथील साई सिद्धी दहीहंडी पथक, चेंबूर यांनी फोडली.**



या कार्यक्रमास आमदार महेश लांडगे, चिखली पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक वसंतराव बाबर, अभिनेत्री मीरा जगन्नाथ, भाजपचे नेते एकनाथ पवार, जेष्ठ कामगार नेते विष्णुपंत नेवाळे आणि घरकुलमधील विविध सामाजिक संस्थांचे कार्यकर्ते उपस्थित होते.

चिखली, घरकूल, नेवाळे वस्ती, हरगुडेवस्ती, कोयनानगर, घरकुल येथील परिसरातील सर्वात मोठा दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी युवक, युवती, महिला व नागरिक या उत्सहात कार्यक्रमात सामील झाले होते. यावेळी एन.एस. डान्स अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी अप्रतिम डान्स करत उपस्थितांची मने जिंकली. निलेशदादा नेवाळे सोशल फाउंडेशन व शिवरक्त प्रतिष्ठान आणि मल्हार ढोल ताशा पथक घरकुल यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

## संपादकीय »

# म्हातारे डोंगर...

***ऑस्ट्रेलियाचे माजी कर्णधार इयन चॅपेल जितका काळ क्रिकेट खेळले, त्याच्यापेक्षाही अधिक काळ त्यांनी क्रिकेटचे समालोचन केले. जवळपास १६ वर्षे त्यांनी ऑस्ट्रेलियाचे प्रतिनिधित्व केले आणि मग ४५ वर्षे समालोचन केले. त्यामुळे आजच्या पिढीतील बहुतांनी क्रिकेटपटू इयन चॅपेल 'पाहिलेले' नसतील. पण समालोचक इयन चॅपेल 'ऐकलेले' जरूर आहेत.***

दोन्ही व्यक्तींच्या स्वभावात, वागणुकीत आणि क्रिकेटविषयीच्या दृष्टिकोनात काहीच फरक नव्हता, असे जुनीजाणती मंडळी सांगतील. इयन चॅपेल आज ७८ वर्षांचे आहेत आणि या वयात, काही व्याधींमुळे समालोचनासाठी आवश्यक धावपळ करण्याची ऊर्जा फारशी शिल्लक नसल्याची कबुली त्यांनी परवा एका मुलाखतीदरम्यान दिली. हा निर्णय त्यांनी स्वत:हून घेतला, कुणी सांगायची वाट पाहिली नाही. विविध नियतकालिकांतून त्यांचे स्तंभलेखन सुरूच राहील. पण समालोचनातून क्रिकेट, क्रिकेटपटू आणि क्रिकेट व्यवस्थेविषयीचे त्यांची रोखठोक मते कानावर पडणार नाहीत, ही जरा खंतावणारी बाब. कारण व्यवस्था आणि (विशेषत: वलयांकित) व्यक्तिमत्त्वे यांविषयी चिकित्सक मतप्रदर्शन करताना, परिणामांची आणि भावनांची भीडभाड अजिबात बाळगायची नाही, याची शिकवण देणारे ते एक विद्यापीठच होते. उत्तम आवाज नि उत्तम शैली नसूनही, इतर बहुतेक समालोचकांच्या तुलनेत त्यांनी विशिष्ट विषयावर, विशिष्ट काळात केलेली टिप्पणी आजही लक्षात राहते. दांभिकता, तोंडदेखलेपणा आणि कथानकवादाच्या सध्याच्या उबगवाण्या काळात, ज्या मोजक्या व्यक्तींचे विचार आजही बहुप्रतीक्षित असतात, त्यांपैकी इयन चॅपेल एक होते.

क्रिकेट हा सांघिक खेळ आहे. येथे खेळाडूंपेक्षा संघाला प्राधान्य मिळाले पाहिजे आणि संपूर्ण व्यवस्थेमध्ये खेळाडू हेच केंद्रस्थानी असले पाहिजेत असे मानणाऱ्या व जाहीरपणे तसे मांडणाऱ्या आद्य क्रिकेटपटूंपैकी इयन चॅपेल हे एक. क्रिकेटच्या मैदानावर संघाचे भवितव्य हे केवळ आणि केवळ कर्णधाराच्या आकलनक्षमतेशी आणि कार्यक्षमतेशी संलग्न असते. ज्यांच्याकडे हे गुण नसतात, ते पळवाटा शोधत राहतात किंवा त्यांच्यासाठी पळवाटा शोधल्या जातात. चॅपेल यांनी १९७१ ते १९७५ या काळात ऑस्ट्रेलियाचे नेतृत्व केले. ऑस्ट्रेलियाने त्यांच्या नेतृत्वाखाली एकही कसोटी मालिका गमावली नाही. नेतृत्व करत असताना त्यांची फलंदाजीची सरासरी एकूण कारकीर्दीतील सरासरीपेक्षा अधिक होती. वैयक्तिक पातळीवर उत्तम कामगिरी करत असतानाच त्यांनी डेनिस लिली, जेफ थॉमसन, डग वॉल्टर्स, केरी ओकिफ, रॉडनी मार्श, ग्रेग चॅपेल, अ‍ॅश्ले मॅलेट, टेरी जेन्नर अशा अनेक गुणवान आणि तऱ्हेवाईक क्रिकेटपटूंचे समर्थ नेतृत्वही केले. संघात नुसतेच गुणवान क्रिकेटपटू असून भागत नाही, त्यांच्याकडून सांघिक कामगिरी करवून घ्यावी लागते.



## आनंदी सकाळ

### चंचल मनाला आवर घातल्यावर परमार्थात होते प्रगती...

आपला देह हा पंचभूतात्मक आहे, म्हणजे पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश ही तत्त्वरूपाने असतात. वाहणारा वायू हा जडस्वरूप वायू आहे; मात्र तत्त्वरूपातील वायू किंवा पाणी हे यापेक्षा वेगळे आहे. मन हे वायू तत्त्वापासून, बुद्धी हे तेज, चित्त आकाश, तर अहंकार हा पृथ्वी तत्त्वापासून म्हणजे जडतत्त्वापासून बनला आहे. यातील मन चंचल आहे. ते भटकते. हा त्याचा दोष; पण जेथे दोष असतात, तेथे काही गुणही असतात. जसे चिकटणे हा हिंगाचा दोष असला, तरी तो योग्य पद्धतीने सेवन केल्यास तो जठररोग दुरुस्त करतो; तसेच चंचलता हा मनाचा दोष असला, तरी परमार्थाच्या दृष्टीने तोही उपयुक्त आहे. मन स्थिर असते, तर जीवनात घडलेली एखादी दु:खद घटना आपण मरेपर्यंत विसरलो नसतो. मन चंचल असल्यामुळे आपण जुने विसरून नव्या उभारीने जीवन सुरू करतो. ही नवी उभारी या चंचल मनामुळे येते, म्हणून चंचलता हा दोष व गुण असे दोन्ही आहे. या चंचल मनाला आवर घातल्यावर परमार्थात प्रगती होते.

# वन-जन-मन : नक्षलींशी लोकशाही मार्गाने संघर्ष






'वनाधिकार व पेसा हे दोन्ही कायदे जंगलात राहणाऱ्या आदिवासी व इतरांवर झालेला ऐतिहासिक अन्याय दूर करणारे आहेत. जंगलात राहून याच अन्यायाविरुद्ध लढण्याची भाषा आजवर नक्षली करत आले. त्यामुळे भविष्यात ते या कायद्याचे समर्थन करत लोकशाही प्रक्रियेत सामील होत असतील तर आनंदच आहे' तत्कालीन पर्यावरण मंत्री जयराम रमेश यांनी हे उद्गार काढले गडचिरोलीतील लेखामेंढ्याला. २०११ मध्ये या गावात झालेल्या वनाधिकार कायद्याच्या अंमलबजावणी शुभारंभ कार्यक्रमातील हा प्रसंग. हा कायदा लागू करताना ऐतिहासिक चुकीची उघड व उदारपणे कबुली देणाऱ्या सरकारच्या मनात किमान यानिमित्ताने तरी नक्षलींना लगाम बसेल हा हेतू होताच. त्यामुळे देशभरात या कायद्याचे स्वागत करताना 'बंदूक का जबाब बांबू से देंगे' अशा घोषणा अनेक ठिकाणी दिल्या गेल्या. या कायद्यामुळे जंगलाचे अधिकार आदिवासींच्या हाती जातील. त्याचा फायदा घेत नक्षली आणखी गैरप्रकार करतील अशी भीतीही तेव्हा व्यक्त केली गेली. जे काही घडेल ते समोर बघू, नक्षली नेमके काय करतात तेही बघू अशीच भूमिका तेव्हा रमेश यांनी घेतली. नंतरच्या १५ वर्षांत नेमके काय झाले?

या मुद्यावर नक्षली नेमके कसे वागले याचा आढावा घेण्याआधी थोडे इतिहासात डोकावणे इष्ट ठरेल. नक्षलींचा उगम झाला तोच मुळात जमीनदारांच्या विरोधात भूमिपुत्रांच्या बाजूने दिलेल्या लढ्यातून. नक्षलबारी, श्रीकाकुलम, विशाखापट्टणमचे उठाव याच मुद्द्यावरचे. भूसुधार कायदे हवेत अशीच तेव्हाची मागणी. नंतर थंडावलेल्या या चळवळीने पुन्हा उभारी घेतली तेव्हा नक्षलींचे मुद्दे बदलले. मध्यभारतातले जंगल हे प्रभावक्षेत्र ठेवायचे असेल तर या भागात राहणाऱ्या आदिवासींच्या प्रश्नाला हात घालायला हवा असे लक्षात येताच जल, जमीन, जंगलचा नारा नक्षलींनी दिला. कायम अन्यायग्रस्त असलेल्या आदिवासींना तातडीने दिलासा देत चळवळीच्या बाजूने वळवायचे असेल तर तेंदूपाने व बांबू तोडणीत होणाऱ्या त्यांच्या आर्थिक पिळवणुकीकडे लक्ष द्यायला हवे हे नक्षलींनी बरोबर हेरले. ही ऐंशीच्या दशकातील घडामोड. मग बंदुकीच्या बळावर नक्षलींनी वनउपज खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांना, वनखात्याला वठणीवर आणण्याचा कार्यक्रम हाती घेतला.

# पाचवा वर्ण अस्पृश्यतेचा...

**'नकोसे झालेले लोक' हे संपादकीय (१९ ऑगस्ट) वाचल्यावर स्वत:ला माणूस म्हणून घेण्याची लाज वाटली. आपल्याकडे चार वर्णामधला शेवटचा वर्ण 'शूद्र' म्हणून ओळखला जातो.**

वर्णव्यवस्थेच्या भेदभावाला आज कायद्याची मान्यता नसली तरी तथाकथित उच्चवर्णीय भारतीयांच्यात तो इतका भिनला आहे की त्या विकृतीचे दर्शन आपल्याला वारंवार अगदी हिंसक पद्धतीनेसुद्धा पाहायला मिळते. शिक्षकांच्या मडक्यातले पाणी प्यायला म्हणून एका दलित विद्यार्थ्याला शिक्षकाने मारण्याची घटना ताजी आहे.

पण या कथित शूद्रांच्यात आणखी एका वर्णाचा समावेश आपल्याला करावा लागेल. तो म्हणजे इस्लामी जनता. मुस्लिमांबद्दलचा हा वर्णभेद जागतिक आहे. अमेरिका, चीन, इस्रायल, भारत तसेच अनेक युरोपीय देश अशा अनेक देशांत या रोगाचा आढळ होताना दिसतो. जणू काही प्रत्येक मुस्लीम जन्मत:च गुन्हेगार असतो अशा तऱ्हेच्या कल्पना जनसामान्यांत इतक्या खोलवर रुजल्या आहेत की प्रत्येक मुस्लिमाकडे आपण संशयाने पाहायला हवे; त्यांना नोकऱ्या, शेजारच्या घरात राहायला जागा अशा साऱ्या सुविधा देणे टाळावे; आपल्या मुलाने किंवा (विशेषत:) मुलीने मुस्लीम व्यक्तीबरोबर लग्न करायचे ठरवले तर साऱ्या कुळाला बट्टा लागला; त्यासाठी मुलाला घराबाहेर काढले पाहिजे; किंवा ऑनर किलिंग केले पाहिजे अशा कल्पना इथे ठाम रुजल्या आहेत. एरवी सभ्य आणि सुसंस्कृत भासणारी माणसे मुस्लिमांबद्दल बोलू लागतात तेव्हा त्यांच्यात जणू काही सैतान संचारला आहे की काय असे वाटायला लागते. ऐकीव माहिती आणि काही सुटी उदाहरणे यांच्या साहाय्याने माणसे सरळसरळ सुतावरून स्वर्ग गाठतात. हे सगळे पाहून मन विषण्ण होते आणि आता तर भाजपच्या जोडीने आम आदमी पक्षानेदेखील या मुस्लिमद्वेषाच्या धगधगत्या कुंडात उडी घेतली आहे. रोहिंग्यांना दिल्लीत घरे देऊ नयेत, त्यामुळे दिल्लीकरांना धोका आहे; वाटल्यास भाजपने आपले शासन असलेल्या राज्यात रोहिंग्यांना राहायला जागा द्यावी असे वक्तव्य आप पक्षाचे आमदार सौरभ भारद्वाज यांनी केले आहे. (अर्थात दिल्लीतसुद्धा रोहिंग्यांना वसवले जाणार नाही असे गृहखात्याने स्पष्ट केल्याने सगळा वाद संपला आहे. भाजप आपल्या द्वेषाच्या संस्कृतीला पूर्णपणे जागला आहे.) 'मनमानी कारभाराबद्दल न्यायालयाने आयकर खात्यालाच दंड लावला' ही बातमी वाचली. भोंगळ आणि मनमानी कारभाराबद्दल आयकर आणि जीएसटी खाते यांच्यात जणू तीव्र स्पर्धा सुरू आहे. एका करदात्यांच्या प्रकरणामध्ये त्यांच्या भाड्याने दिलेल्या जागेचे भाडे त्यांच्या राहत्या घरासाठीदेखील मिळाले आहे असे दाखवून मोठी डिमांड काढली गेली. दुसऱ्या एका प्रकरणामध्ये भागीदारी संस्थेला वैयक्तिक करदाता समजून त्यातून उद्भवणाऱ्या तथाकथित कारणांमुळे त्यांचे रिटर्न सदोष असल्याचे कळवले गेले. असे असंख्य प्रकार सीए आणि करसल्लागारांना रोज अनुभवास येत आहेत. सध्याचा कहर म्हणजे करदात्याच्या टॅक्स रिटर्नमध्ये रिफंड निघाला असेल तर, त्याला कधीच कळवल्या न गेलेल्या अनेक वर्षांच्या चुकीच्या थकबाक्या त्याच्या नावासमोर अचानक जन्मास येत आहेत. एका जेष्ठ नागरिक महिलेने वर्ष २०२१-२२ साठी रिफंड मागितला असता त्यांना चक्क २००५-०६ सालाची, कुठलाही आगापिछा न सांगितलेली, एक थकबाकी तुमच्या या रिफंडसमोर वळती करत आहोत असा मेल आला. आयकर खात्याच्या बव्हंशी सर्वच बिनचेहऱ्याच्या (फेसलेस) सुनावण्या आणि अन्यही बिनचेहऱ्याच्या कार्यवाह्या अनाकलनीय होत असून करदात्यांना प्रचंड मनस्ताप देणाऱ्या ठरत आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



पवित्र सोंवळीं ।
एक तीं च भूमंडळीं ॥१॥
ज्यांचा आवडता देव ।
अखंडित प्रेमभाव ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी गाळा क्रमांक 79-80 छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, संत तुकाराम नगर, अग्निशमन केंद्रासमोर, पिंपरी, पुणे - 411018. **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### पीओपीच्या गणेशमूर्तींच्या विसर्जनासाठी मुंबईत १५० कृत्रिम तलाव उभारणार

। मुंबई ।। महाईन्यूज ।

अवघ्या १० दिवसांवर आलेल्या गणेशोत्सवाची मुंबईत जोरदार तयारी सुरू आहे. यंदा प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) गणेशमूर्तींचे कृत्रिम तलावांमध्ये विसर्जन करण्याचे बंधन घालण्यात आले आहे. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेने यंदा कृत्रिम तलावांची संख्या वाढविण्याचा निर्णय घेतला असून संपूर्ण मुंबईत १५० कृत्रिम तलाव उपलब्ध करण्यात येणार आहेत. केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाने पर्यावरणाचे होणारी हानी लक्षात घेऊन पीओपीवर बंदी घातली आहे. मात्र गेल्या दोन वर्षांमध्ये बंदी आदेशांची अंमलबजावणी होऊ शकली नाही. गणेशोत्सव आणि मूर्तिकारांनी तयार केलेल्या पीओपीच्या गणेशमूर्ती लक्षात घेऊन त्यांचे विसर्जन कृत्रिम तलावांमध्ये करण्याचे बंधन घालण्यात आले आहे. मुंबईमधील घरगुती गणपतींची संख्या लक्षात घेऊन पीओपीच्या गणेशमूर्तींच्या विसर्जनासाठी कृत्रिम तलावांची संख्या वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. गतवर्षी मुंबईत ८८ कृत्रिम तलावांमध्ये गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले होते.

# “देवेंद्र फडणवीस भाजपा-सेना युतीचे मुख्यमंत्री होणार”!

## चंद्रशेखर बावनकुळे यांचे मोठे विधान

। मुंबई । महाईन्यूज ।

अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाने भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांना पत्र लिहून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पुण्यातून लोकसभेची उमेदवारी द्यावी, अशी मागणी केली होती. या मागणीनंतर फडणवीस आपला मोर्चा दिल्लीकडे वळवणार का? असे विचारले जात होते. त्यानंतर आता भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे. देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राचे नेते आहेत. ते कोठेही जाणार नाहीत,” असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

तसेच आगामी काळात फडणवीस भाजपा-शिवसेना युती सरकारचे मुख्यमंत्री असतील, असे मोठे विधानही बावनकुळे यांनी केले. ते अकोल्यात माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते.

“या राज्याचे नेतृत्व देवेंद्र फडणवीस करत आहेत. पुढेही करत राहतील. ते दिल्लीला जाणार नाहीत. सध्या येत असलेल्या बातम्या काल्पनिक आहेत. देवेंद्र फडणवीस आमचे नेते आहेत. आगामी काळात ते भाजपा-शिवसेना युती सरकारचे मुख्यमंत्री होतील.

आमच्यासारखा कोणताही कार्यकर्ता देवेंद्र फडणवीस यांची बरोबरी करू शकत नाही. या राज्याला देवेंद्र फडणवीसच



पुढे नेऊ शकतात. त्यांच्याकडे विकासाचा दृष्टिकोन आहे,” असे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाने जे पी नड्डा यांना एक पत्र लिहिले होते.“पुण्यातील ब्राह्मण महासंघ २००९ मध्ये काँग्रेसच्या सुरेश कलमाडींसोबत उभा होता. २०१४ मध्ये अनिल शिरोळे आणि २०१९ मध्ये गिरीश बापट यांना पाठिंबा दिला होता. त्याचे परिणाम तुमच्यासमोर आहेत. त्यामुळे फडणवीसांसारख्या राष्ट्रीय नेतृत्वासाठी ही सुरक्षित जागा आहे. फडणवीसांना फक्त अर्ज भरायचा आहे. जिंकवण्याचं काम ब्राह्मण महासंघ करणार,” असे या पत्रात म्हणण्यात आले होते.

“अटलबिहारी वाजपेयी, नरेंद्र मोदी यांच्यानंतर नेतृत्वाची ही परंपरा देवेंद्र फडणवीस कायम राखतील असा विश्वास आम्हाला वाटतो. अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ कोणत्याही पक्षाचे समर्थन करत नाही. तरीही राष्ट्रहितासाठी आमचा आग्रह आहे,” अशी मागणी या पत्रात करण्यात आली होती.

दरम्यान अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या मागणीवर भाजप नेते तथा मंत्री चंद्रकांत पाटील यांनी देखील प्रतिक्रिया दिली होती. देवेंद्र फडणवीस हे कर्तृत्ववान नेते आहेत. कर्तृत्वाच्या आधारावरच त्यांचा विचार केला जाणार, असे चंद्रकांत पाटील म्हणाले होते.

“या देशामध्ये प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा तसेच मागणी करण्याचा अधिकार आहे. देवेंद्र फडणवीस हे जात, धर्माच्या वर आलेले आहेत. ते एक कर्तृत्ववान नेते आहेत. त्यामुळे त्यांचा विचार हा त्यांच्या कर्तृत्वाच्या आधारेच झालेला आहे. त्यामुळे मागणी कोणीही करू शकतं,” अशी प्रतिक्रिया चंद्रकांत पाटील यांनी दिली होती.

# “मंत्रिपदासाठी अजून काय काय करावे लागणार…”;

## अमोल मिटकरींचा राणा दामपत्याला खोचक टोला

।मुंबई । महाईन्यूज ।

अमरावतीमध्ये राणा दाम्पत्यांनी दहीहंडीचे आयोजन केले. या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची रक्ततुला करण्या आली. या रक्ततुलेवरून राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अमोल मिटकरी यांनी राणा दाम्पत्यावर निशाणा साधला आहे. “शिंदे गट आणि भाजपामधील नेत्यांची निष्ठी संपली आहे. मंत्रीपदासाठी भाजपा आमदार आणि शिंदे गट देवेंद्र फडणवीसांना खूष करत आहेत, अशी टीका मिटकरांनी केली आहे. रवी राणांना मंत्रीपद मिळावे म्हणून नवनीत राणांचे प्रयत्न

“मंत्रीपद मिळवण्यासाठी रवी राणांना आणखी काय काय करावे



लागेल हे येणारा काळच ठरवेल. रक्ततुलाच्या माध्यमातून देवेंद्र फडणवीसांना खूष करण्यासाठी आणि रवी राणा यांची मंत्रीपदी वर्णी लागावी म्हणून नवनीत राणांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे”, अशी टीका मिटकरींनी केली आहे. भाजपासोबत शिंदे गटाचेही सर्व आमदार देवेंद्र फडणवीसांना खूष करण्याचा प्रयत्न करत आहेत.

देवेंद्र फडणवीस हे कृष्णरुपी असल्याचे वक्तव्यही आशिष शेलारांनी केलं होतं. फडणवीसांना खूष केलं तर ते आपल्याला मंत्रीपद देऊ शकतात या लालसेपोटीच राणा दाम्पत्याचा हा अट्टाहास सुरु असल्याचा आरोप मिटकरींनी केला आहे.

# उद्धव ठाकरे आणि शिंदे गटातील सत्तासंघर्षाची सुनावणी पुन्हा लांबणीवर

। मुंबई । महाईन्यूज ।

राज्यातील सत्तासंघर्षावर उद्या होणारी सुनावणी आता आणखी लांबणीवर पडली आहे. मागील सुनावणीच्या वेळी सर्वोच्च न्यायालयाने पुढील सुनावणी २२ ऑगस्ट रोजी होईल असं सांगितल होतं. मात्र, उद्या होणारी सुनावणी ही परवा म्हणजे २३ ऑगस्टला होणार आहे. त्रिसदस्यीय खंडपीठातले एक न्यायमूर्ती उद्या उपलब्ध नसल्यामुळे ही सुनावणी लांबणीवर गेल्याचे सांगण्यात आले आहे. निवडणूक आयोगाची मुदतही २३ ऑगस्टला संपणार

सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणी ४ ऑगस्टला शेवटची सुनावणी घेण्यात आली होती. त्यानंतर तिसऱ्यांदा ही सुनावणी पुढे ढकलण्यात आली आहे. शिवसेना कुणाची या मुद्द्यावर आता निवडणूक आयोगातही कार्यवाही सुरु आहे. उद्धव ठाकरे गटाने कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी चार आठवड्यांचा




वेळ मागितला होता. पण आयोगानं दोन आठवड्यांचाच वेळ दिला आहे. २३ ऑगस्टला याची मुदत संपत असून सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी देखील २३ ऑगस्ट रोजी होण्याची शक्यता आहे. सर्वोच्च न्यायालयातील त्रिसदस्यीय खंडपीठापैकी न्यायमूर्ती सी. टी. रवीकुमार उद्या अनुपस्थित असल्यामुळे ही सुनावणी पुढे ढकलण्यात आली असल्याची माहिती मिळाली आहे. त्यामुळे उद्याची सुनावणी आता परवा होणार आहे. ७ ऑगस्ट रोजी शिवसेना आणि शिंदे गटाने दाखल केलेल्या पाच याचिकांवर सरन्यायाधीश व्ही. एन. रमणा यांच्या अध्यक्षतेखालील तीन सदस्यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. या प्रकरणावर सखोल कायदेशीर युक्तिवाद होण्याची गरज असेल तर हे प्रकरण व्यापक घटनापीठाकडे देण्याचा विचार केला जाऊ शकतो, असे मत गेल्या सुनावणीमध्ये सरन्यायाधीशांनी मांडले होते. त्यामुळे या प्रकरणी घटनापीठ स्थापन करण्यासंदर्भात न्यायालय काय निर्णय देते, याकडे दोन्ही गटांसह राजकीय निरीक्षकांचे लक्ष लागले आहे. सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा हे २६ ऑगस्ट रोजी निवृत्त होत असून, त्याआधी निर्णय होण्याची आशा शिवसेनेला आहे.

# अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या भागांचे वेळेत पंचनामे होणार !

## शेतकऱ्यांना लवकरच मिळणार भरपाई"; कृषीमंत्री अब्दुल सत्तारांची घोषणा

मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

महाराष्ट्रात अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतकरी सातत्याने सरकारकडे नुकसान भरपाईची मागणी करत आहेत. अनेक जिल्ह्यांत पिकांचे पंचनामे केले जातात. मात्र, मदतीची रक्कम शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाही. मात्र, यंदा असे घडू नये यासाठी राज्याचे नवे कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी पिकांच्या नुकसानीचा पंचनामा वेळेत सादर करण्याचे आदेश वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले आहेत. याशिवाय त्यांनी अधिकाऱ्यांना पिकांच्या नुकसानीचे फोटो काढण्यास सांगितले आहे. या फोटोंच्या आधारे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिली जाणार आहे. कृषी विभागातील पदे लवकरच भरणार



कृषी विभागात रिक्त असणारी पदे लवकरच भरणार असल्याची माहिती कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी दिली आहे. भरल्यानंतर लवकरात लवकर नुकसानग्रस्त भागांचा पंचनामा करून मदत जाहीर करता येऊ शकते. महसूल विभागातही काही पदे रिक्त आहेत. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी चर्चा करून महसूल विभागातील रिक्त पदेही लवकरच भरली जातील असेही सत्तार म्हणाले.

### शेतकऱ्यांना पीकविमा मुदवाढ देण्याचा प्रयत्न

शेतकऱ्यांना पीक विम्यात मुदतवाढ देण्यासाठी राज्य शासनाकडून प्रयत्न करण्यात येत आहेत. मात्र, पूर्वी पीक विम्याची ९८ टक्के रक्कम राज्य आणि केंद्र सरकार भरायची. आणि २ टक्के रक्कम शेतकरी बांधव भरायचे. मात्र, राज्यात पीक विम्याबाबतचा बीड पॅटर्न



आणण्यात आला आहे. या पॅटर्ननुसार २० टक्केपेक्षा जास्त पीकविमा विमा कंपनी घेऊ शकत नाहीत. विधानसभा आणि कॅबिनेटमध्ये या पॅटर्नला मंजूरी मिळाली आहे. त्यामुळे भविष्यात पीकविमा कंपन्यांना थेट शेतकऱ्यांना पैसे द्यावे लागणार आहेत. पीकविमा संदर्भात धोरणात्मक निर्णय घेऊन पाठपुरावा करणार असल्याचेही सत्तारांनी सांगितले.

### पिकाच्या नुकसानीचे छायाचित्र काढणे बंधनकारक

दरवर्षी सरकारकडून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली नसल्याच्या तक्रारी येत आहेत. पुढे त्यांना सांगितले की, राज्यात दरवर्षी किमान लाखो शेतकरी मदतीशिवाय राहतात. यंदा असे होऊ नये व योग्यवेळी पंचनामा करण्यात यावा. यासाठी सत्तारांनी अधिकाऱ्यांना पंचनामा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पिकाच्या नुकसानीचे छायाचित्र काढणे बंधनकारक केले आहे.

### खरीप पिकांना मोठा फटका

कृषीमंत्री पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर अब्दुल सत्तार नुकसानग्रस्त भागांची पाहणी करण्यासाठी विदर्भ दौऱ्यावर आहेत. अतिवृष्टीमुळे विदर्भात सर्वाधिक नुकसान झाले असून खरीप पिकांना याचा मोठा फटका बसला आहे. नुकसानग्रस्त भागातील परिस्थितीचा आढावा घेऊन सत्तार शेतकऱ्यांशी संवाद साधत आहेत.



# लोकसभा निवडणुकीत मोदी-केजरीवाल अशीच लढत!

। नवी दिल्ली । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।

"आगामी लोकसभा निवडणुकांची प्रमुख लढत ही आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल आणि नरेंद्र मोदी यांच्यात होईल. केजरीवाल यांना घाबरवण्यासाठीचे विविध डावपेच मोदी लढवत आहेत," असा आरोप दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांनी शनिवारी केला. केंद्रीय अन्वेषण ब्यूरोने (सीबीआय) सिसोदिया यांच्या निवासस्थानी टाकलेल्या छाप्यानंतर प्रतिक्रिया देताना सिसोदिया बोलत होते.

'सीबीआय'ने दिल्ली सरकारच्या अबकारी कर अंमलबजावणी धोरणात कथित भ्रष्टाचार झाल्याप्रकरणी गुन्हा दाखल केल्यावर शुक्रवारी सकाळी सिसोदिया आणि सनदी अधिकारी आरव गोपीकृष्ण यांच्या निवासस्थानी छापे टाकले होते. या तपास संस्थेने १९ अन्य ठिकाणीही तपास केला. दिल्लीतील अबकारी कराचे धोरण संपूर्ण पारदर्शक पद्धतीने लागू केले असल्याचे सांगून सिसोदिया यांनी स्पष्ट केले, की २०२१-२२ साठीचे हे धोरण सर्वात चांगले आहे. यामध्ये कोणताही भ्रष्टाचार झालेला नाही. मोदींचे सरकार अरविंद केजरीवाल यांना रोखण्यासाठी हे डावपेच खेळत आहे. केजरीवाल सरकारने शैक्षणिक आणि आरोग्य क्षेत्रांत केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची चर्चा अवघ्या जगात आहे.

सिसोदिया यांनी सांगितले, की माझ्या घरी छापा टाकणारे अधिकारी चांगले आहेत. त्यांना वरून छापा टाकण्यासाठी आदेश मिळाले आहेत.

# सरकार वेळेवर निर्णय घेत नाही

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरींचा घरचा आहेर

। नवी दिल्ली । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।

'पैशांची अडचण येत नाही. मात्र प्रोजेक्ट आखले जातात. पण ते वेळेवर पूर्ण होत नाही. याची कधी कधी खंत वाटते. म्हणून माझे प्राधान्य हे प्रकल्प आखणीबरोबरच ते वेळेत कसे पूर्ण होतील, याकडे असते', असे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटले. असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्सने आयोजित केलेल्या 'NATCON 2022' या कार्यक्रमाला नितीन गडकरी यांनी हजेरी लावली होती. त्यावेळी या कार्यक्रमातील उपस्थितांना संबोधित करताना गडकरी हे विधान केले. तसेच, 'विकासकामांच्या बाबतीत निर्णय



घेताना सरकार वेळेवर निर्णय घेत नाही', असेही विधान करत नितीन गडकरी यांनी सरकारला घरचा आहेर दिला आहे. या कार्यक्रमात उपस्थितांना संबोधिताना गडकरी यांनी सरकारवर निशाणा साधला. "आमच्याकडे पैशांचा प्रोब्लेम नाही. बँका वाटेल तेवढे कर्ज देण्यास तयार आहेत. परंतु, मानसिकतेचा प्रश्न असून, पैसा उभा राहतो. तसेच, प्रोजेक्ट आखले जातात. पण ते वेळेवर पूर्ण होत नाही. याची कधी कधी खंत वाटते.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या दौऱ्याआधी पंजाबमध्ये भारतीय गुप्तचर यंत्रणेकडून 'अलर्ट' जारी!

## पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआय (ISI)चा पंजाबमध्ये दहशत माजवण्याचा कट

।नवी दिल्ली । ।महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी पंजाब दौऱ्यावर जाणार आहेत. मात्र त्यांच्या नरेंद्र मोदी यांच्या या दौऱ्यापूर्वी पंजाबमध्ये अलर्ट जारी करण्यात आला आहे. याबाबत भारताच्या गुप्तचर यंत्रणांनी माहिती दिली असून, पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआय (ISI) चा पंजाबमध्ये दहशत माजवण्याचा कट असल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला. त्यामुळे पंजाबमध्ये नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्यापूर्वी अलर्ट जारी करण्यात आला आहे. तसेच, या कटात पंजाबमधील 10 बडे आणि महत्त्वाचे नेते दहशतवाद्यांच्या निशाण्यावर असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. त्यामुळे केंद्र सरकार त्यांना सुरक्षा देऊ शकते. मिळालेल्या माहितीनुसार, पाकिस्तानी (Pakistan) गुप्तचर संस्था ISI ने चंदीगड आणि मोहालीमध्ये दहशतवादी हल्ल्यांची योजना आखत असल्याच्या संशयामुळे भारताच्या गुप्तचर यंत्रणांनी अलर्ट जारी केला आहे. भारताच्या गुप्तचर यंत्रणेच्या या अलर्टनुसार चंदीगड आणि मोहालीमध्ये दहशतवादी हल्ला होण्याचा कट असून दहशतवादी बस स्थानकाला लक्ष्य करण्याची शक्यता असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. भारताच्या गुप्तचर यंत्रणेच्या या अलर्टनंतर पंजाबमध्ये सर्वत्र



तपासणी करण्यात येत आहे. या प्रकरणी भारतीय गुप्तचर यंत्रणांनी राज्य पोलीस, जीआरपी आणि राज्य गुप्तचर संस्थेला योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत.


देशातील शांतता भंग करण्यासाठी दहशतवादी कट करून घातपात करण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र कोणताही घातपात होऊ नये यापार्श्वभूमीवर सर्वत्र सुरक्षा व्यवस्थेत वाढ करण्यात आली आहे. तसेच ज्या लोकांशी ISI चे संबंध आहेत, त्यांचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

# अभिनेत्री मुक्ता बर्वेंचे रंगभूमीवर पुनरागमन, केली नव्या नाटकाची घोषणा



अभिनेत्री मुक्ता बर्वेची मनोरंजन सृष्टीतील एक चतुरस्त्र अभिनेत्री अशी ओळख आहे. नाटक, मालिका, चित्रपट अशा विविध माध्यमात तिने आपल्या अभिनयाचं नाणं खणखणीत वाजवलं आहे. तिच्या सहज सुंदर अभिनयाने ती प्रेक्षकांच्या मनात घर करण्यात यशस्वी झाली आहे. मुक्ता आणि रंगभूमीचं नातं फार जुनं आहे. काही वर्षांपूर्वीपर्यंत ती रंगभूमीवर सक्रिय होती. तिच्या तुफान गाजलेल्या 'कोडमंत्र' या नाटकानंतर मुक्ता आता नवीन कोणतं नाटक घेऊन येणार याची नाट्यरसिक आतुरतेने वाट बघत होते. अखेर नुकतेच मुक्ताने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करत प्रेक्षकांना आनंदाची बातमी दिली आहे. त्यानुसार मुक्ता 'चारचौघी' या नाटकातून आपल्या भेटीला येणार आहे. 'चारचौघी' हे नाटक काही वर्षांपूर्वी रंगभूमीवर आले होते. आता 'चारचौघी' नावाचं नाटक एका नव्या संचात पुन्हा बघायला मिळणार आहे. हे नाटक एका नव्या ढंगात सुरु होणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. मुक्ताने स्वतः याबद्दल सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत माहिती दिली आहे. तसेच या नव्या संचात 'चौघी' कोण असतील असे कोडेही प्रेक्षकांना घातले आहे.

# अभिनेत्री महिमा चौधरी यांचा 'इमर्जन्सी' चित्रपटातील फर्स्ट लूक आउट, दिसणार 'या' भूमिकेत




बॉलिवूड क्वीन कंगना रणौत लवकरच 'इमर्जन्सी' चित्रपटात दिसणार आहे. कंगनाचा 'इमर्जन्सी' हा चित्रपट सध्या चर्चेत आहे. चित्रपटाच्या घोषणेपासून या चित्रपटाबद्दल वेळोवेळी नवीन अपडेट्स समोर येत होते. तर यातील कलाकारांच्या भूमिका आणि त्यांचा लूकही एकेक करून आउट केला जात होता. आता नुकताच या चित्रपटातील महिमा चौधरी यांचा फर्स्ट लूक समोर आला आहे. अभिनेत्री कंगना रणौत हिने सोशल मीडियावरून हा लूक शेअर केला आहे. महिमा चौधरी या चित्रपटात पुपुल जयकर यांची भूमिका साकारताना दिसणार आहेत. पुपुल जयकर या संस्कृतिक कार्यकर्त्या, लेखिका होत्या.

# अभिनेत्री सोनाली खरेची नवी इनिंग सुरु, लंडनमध्ये सुरू केले काम




मराठीतील लोकप्रिय अभिनेत्रींच्या यादीमध्ये अभिनेत्री सोनाली खरेचं नाव आवर्जून घेतलं जातं. सोनालीने मराठी मालिका, चित्रपट करत प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवलं. मातृदिनाच्या निमित्ताने तिने तिच्या एका मराठी चित्रपटाची घोषणा केली होती. विशेष म्हणजे या चित्रपटाच्या निमित्ताने तिने निर्मितीत पाऊल टाकले आहे. सोनालीने ब्लुमिंग लोटस प्रॅाडक्शन हाऊसची सुरुवात केली आहे. या प्रॅाडक्शन अंतर्गत तिने 'मायलेक' या पहिल्या चित्रपटाची काही महिन्यांपूर्वी घोषणा केली होती. नुकतेच 'मायलेक' या चित्रपटाच्या शूटिंगला लंडनमध्ये सुरुवात झाली आहे. सोनाली खरेने सोशल मीडियावर फोटो शेअर करत चाहत्यांना ही आनंदाची बातमी दिली. विशेष म्हणजे 'मायलेक' चित्रपटाद्वारे सोनालीची मुलगी सुद्धा अभिनय क्षेत्रात पदार्पण करणार आहे. सोनाली आणि सनाया या मायलेकींचीच जोडी मुख्य भूमिकेत दिसणार असून सनाया आनंद ही सोनालीची मुलगी मायलेक चित्रपटात तिच्या मुलीची भूमिका साकारणार आहे. आई-मुलीचं सुंदर नातं दाखवण्याचा प्रयत्न सोनाली या चित्रपटाच्या माध्यमातून करणार आहे.

या चित्रपटात अभिनेता उमेश कामत महत्वपूर्ण भूमिकेत पाहायला मिळणार आहे. त्याच्याबरोबरच अभिनेते संजय मोने ही चित्रपटात दिसणार आहेत. प्रियांका तन्वर या चित्रपटाचे दिग्दर्शन करणार आहेत. या चित्रपटात उमेश कामत याची भूमिका काय असेल हा अजून स्पष्ट झालं नाहीये.

# गेम ऑफ थ्रोन्स'इतकीच लोकप्रियता 'हाऊस ऑफ ड्रॅगन'ला मिळणार का?







सध्या सगळेच प्रेक्षक ओटीटीकडे वळले आहेत. खासकरून ओटीटीच्या बाबतीत भारतीय प्रेक्षकांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. कोविड महामारीमुळे ही वाढ झाली आहे. पण त्याआधी प्रेक्षकांना 'वेबसीरिज'ची ओळख करून देणारा एकमेव शो तो म्हणजे 'गेम ऑफ थ्रोन्स'. या वेबसिरिजची भारतात खासकरून जास्त चर्चा झाली. भारतीया प्रेक्षकांनी वेगवेगळ्या कारणांसाठी या सीरिजची पारायणं केली आहेत. यामधली पात्रं तर लोकांनी अक्षरशः डोक्यावर घेतली होती. आता याच सिरिजचा प्रीक्वल म्हणजेच या सिरिजच्या आधीची गोष्ट पुन्हा एकदा वेबसीरिजच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत.

लेखक जॉर्ज आर आर मार्टिन यांच्या लोकप्रिय 'फायर अँड ब्लड' या कादंबरीवर आधारीत 'हाऊस ऑफ ड्रॅगन' उद्या म्हणजेच २२ ऑगस्ट रोजी हॉटस्टार या ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणार आहे. यात 'गेम ऑफ थ्रोन्स'मधल्या कहाणीच्या २०० वर्षं आधी घडलेल्या घटनांना दाखवण्यात येणार आहे. १० एपिसोडची ही सीरिज उद्यापासून चाहत्यांना बघता येणार आहे. यामध्ये हाऊस ऑफ टार्गेरीयनचा इतिहास दाखवला जाणार आहे. या सीरिजमध्ये आणखीन कोणती वेगळी पात्रं आपल्याला बघायला मिळणार, राजसिंहासनासाठी नेमकी कोणामध्ये चुरस बघायला मिळणार या सगळ्या गोष्टींचा उलगडा उद्यापासून होणार आहे. तसं बघायला गेलं तर या सीरिजमधलं प्रत्येक पात्रं उत्कृष्टच आहे. पण यातलं राजकुमारी रेनेरा हिच्या पात्रासाठी बरेच प्रेक्षक उत्सुक आहेत. 'गेम ऑफ थ्रोन्स'प्रमाणे या सीरिजमध्येसुद्धा प्रेक्षकांना अनपेक्षित धक्के बसू शकतात असं यातल्या कलाकारांचं म्हणणं आहे.

# दारिद्र्याच्या छायेतील 'निशान'

## नेटिझन्सचा प्रतिसाद : 'रेडबड मोशन पिक्चर्स' आणखी एक वास्तवदर्शी लघुपट




पुणे ।महाईन्यूज ।

दारिद्र्याच्या छायेखाली पालात राहणाऱ्या चिमुकल्यांचं देशप्रेम दर्शविणारा "निशान" हा लघुपट भारताच्या स्वातंत्र्य अमृत महोत्सवी वर्षानिमित्त १५ ऑगस्ट रोजी प्रदर्शित झाला आहे. रेडबड मोशन पिक्चर्स यांनी पुन्हा एकदा सामाजिक आशय असलेला लघुपट बनवला आहे. या लघुपटाला नागरिकांचा भरभरून प्रतिसाद मिळत आहे.

परिस्थितीने निर्बंध घातले तरी मनातली उर्मी एखादी गोष्ट करण्यापासून स्वतःला रोखू शकत नाही, मग वाट्टेल ते झाले तरी परिणामाची तमा न बाळगता ते पाऊल उचलण्याचे धाडस केल्याशिवाय मन समाधान मानत नाही. याचा तंतोतंत सारांश 'निशान' या लघुपटातून मांडण्याचा अतिशय प्रमाणिक प्रयत्न दिग्दर्शक व चार्टर्ड अकाऊंटन्ट अरविंद भोसले यांनी केला आहे. या पूर्वी ही भोसले यांनी महिला सशस्तीकरणाचा सामाजिक संदेश देणारा "भावना" लघुपट बनवला आहे. या लघुपटाला सलग ३ आंतरराष्ट्रीय पुरस्कार देखील मिळालेले आहेत. "निशान" हा डोळ्यांत अंजन घालणारा लघुपट अवघ्या सात दिवसात पूर्ण करण्यात आला आहे. याचे संपादन पिंपरीतील एपिएच स्टुडिओच्या संचालिका अभिनेत्री प्रज्ञा पाटील यांनी केले आहे. या लघुपटातील सर्व कलाकार पिंपरीतील नेहरूनगर, विठ्ठलनगर झोपडपट्टी पुनर्वसन परिसरातील आहेत. विशेष बाब म्हणजे यातील सर्व कलाकार प्रथमच अभिनय करत आहेत. या लघुपटाचे निर्माते मनोज गायकवाड, राजेंद्र कालिया हे आहेत. बाल कलाकाराची मुख्य भूमिका गौरव कदम या चिमुकल्याने केली आहे. तर सह बाल कलाकारची भूमिका वेदांत डोंगरे, कुमार आवचर, प्रज्वल तुमकुर, प्रदीप तुमकुर यांनी काम केले आहे. अंकुर शहा, बसवराज तुमकुर यांनी मोठ्या कलाकारांची भूमिका साकारली आहे. छायाचित्रण प्रशांत कोचरेकर, संगीतबद्ध प्रथमेश कानडे. या लघुपटासाठी शिवा हरळ, सुनील वाघमारे, अर्चना गुप्ता यांनी विशेष परिश्रम घेतले आहे.

## शॉर्ट न्यूज »

### 'अंतिम' बनली भारताची पहिली 'गोल्डन गर्ल'



नवी दिल्ली । महाईन्यूज

भारताच्या अवघ्या 17 वर्षाच्या अंतिम पांघलने 20 वर्षाखालील जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्ण पदक जिंकले. अंतिम पांघलने फक्त सुवर्ण पदक जिंकले नाही तर 20 वर्षाखालील जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्ण पदक जिंकणारी पहिली भारतीय महिला कुस्तूपटू देखील बनली. याचबरोबर भारताने 20 वर्षाखालील जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत 7 पदके मिळवत सांघिक क्रमवारीत दुसरे स्थान पटकावले. अंतिम पांघलने 53 किलो वजनी गटाच्या सुवर्ण पदकाच्या सामन्यात कझाकिस्तानच्या अल्तयन शाकायेव्हाचा 8 - 0 असा सहज पराभव केला. अंतिम पांघलने याच वर्षी आशिया ज्युनियर चॅम्पियनशिप स्पर्धेत देखील सुवर्ण पदकाची कमाई केली होती. भारताची ही महिला कुस्तीतील युवा पिढी आहे.

# हुड्डाने केले वर्ल्ड रेकॉर्ड!

## रोमानियाच्या खेळाडूला टाकले मागे

। हरारे । महाईन्यूज ।



भारताने झिम्बाब्वे विरूद्धचा दुसरा वनडे सामना 5 विकेट्सनी जिंकला. भारताने तीन मामन्यांच्या मालिकेत 2 - 0 अशी विजयी आघाडी घेतली आहे. तिसरा सामना 22 ऑगस्ट रोजी हरारे येथे खेळवला जाणार आहे. दरम्यान, प्रथम फलंदाजी करणाऱ्या झिम्बाब्वेने भारतासमोर 162 धावांचे आव्हान ठेवले होते. हे आव्हान पार करताना भारताला आपले पाच फलंदाज खर्ची घालावे लागले. अखेर दीपक हुड्डा आणि संजू सॅमसन यांनी चौथ्या विकेटसाठी 56 धावांची भागीदारी रचून भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. दरम्यान, भारतीय संघात मधल्या फळीत आपली जागा पक्की करण्यासाठी सर्वस्व पणाला लावलेल्या दीपक हुड्डाने झिम्बाब्वे विरूद्धच्या दुसऱ्या सामन्यात एक वर्ल्ड रेकॉर्ड केले.

दीपक हुड्डाने पदार्पणानंतर सर्वाधिक सलग सामने जिंकण्याचा वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावावर केला. दीपकच्या पदार्पणापासून भारतीय संघाने आतापर्यंत सलग 16 सामने जिंकले आहेत. यापूर्वी हे रेकॉर्ड रोमानियाच्या सॅटव्हिक नादीगोटला याच्या नावावर होते. त्याच्या पदार्पणानंतर रोमानियाने सलग 15 सामने जिंकले होते. दीपक हुड्डाने दुसऱ्या वनडे सामन्यात महत्वाच्या 25 धावा आणि एक विकेट देखील घेतली. दरम्यान, भारताने झिम्बाब्वेचे 162 धावांचा आव्हान 5 फलंदाजांच्या मोबदल्यात पार करत दुसरा वनडे सामना 5 विकेट्सनी जिंकला. झिम्बाब्वेने भारताची अवस्था 4 बाद 97 धावा अशी करून चांगली झुंज दिली होती. मात्र संजू सॅमसन (नाबाद 39) आणि दीपक हुड्डा (25) यांनी पाचव्या विकेटसाठी 56 धावांची भागीदारी रचून भारताला विजयाच्या समिप पोहचवले. भारताकडून शिखर धवन आणि शुभमन गिलने प्रत्येकी 33 धावा केल्या. तर शार्दुल ठाकूरने 38 धावा देत 3 बळी टिपले. भारताने तीन वनडे सामन्यांच्या मालिकेत 2 - 0 अशी विजयी आघाडी घेतली आहे.

मालिकेतील तिसरा वनडे सामना 22 ऑगस्टला होणार आहे. भारताने मालिका आधीच खिशात टाकली असल्याने तिसऱ्या सामन्यात कर्णधार केएल राहुल बेंचवरील ऋतुराज गायकवाड, राहुल त्रिपाठी, शाहबाज अहमद आणि आवेश खान सारख्या युवा खेळाडूंना संधी देणार का हे पहावे लागले.



# क्रिकेटचा खेळ निर्णायक वळणावर...

।नवी दिल्ली। महाईन्यूज ।

न्यू झीलंडचा महत्त्वाचा खेळाडू ट्रेंट बोल्ट यानं आपल्या क्रिकेट नियामक मंडळाच्या करारापासून दूर राहण्याचा निर्णय घेतला आणि या बातमीनं क्रिकेटच्या खेळाचा अभ्यास करणारे लोक विस्मयचकित झाले. तसं बघायला गेलं तर कधी तरी कोणत्या तरी खेळाडूच्या बाबतीत हे होणारच होतं. बोल्ट त्या वेगळ्या प्रवासातला पहिला वारकरी ठरला. क्रिकेटच्या खेळाला वेगळंच वळण लागत असल्याच्या सर्व खुणा स्पष्ट दिसत असूनही पालकसंस्था असलेल्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट कौन्सिलनं काणाडोळा केल्यानं क्रिकेटचा खेळ अचानक भलत्याच वळणावर येऊन ठाकला आहे. बोल्टच्या निर्णयाचा अर्थ काय?

बोल्टच्या निर्णयाचे दूरगामी पडसाद काय असू शकतील अशी शंका वाचकांच्या मनात नक्कीच आली असेल. सांगतो. ३३ वर्षांच्या बोल्टनं आजवर ७८ कसोटी सामने खेळले आहेत व ३०० पेक्षा जास्त बळी कसोटी क्रिकेटमध्ये घेतले आहेत. न्यूझीलंडनं भारतीय संघाला पराभूत करून टेस्ट चॅम्पियनशिप जिंकली, त्या विजयी संघाचा बोल्ट हा अत्यंत मोलाचा खेळाडू होता. त्यानं सर्वांगीण करार स्वीकारायला नकार दिला आहे. याचा अर्थ असा आहे की, बोल्ट आता न्यूझीलंडच्या संघाला सदैव उपलब्ध असेलच असं नाही. 'न्यूझीलंड क्रिकेट बोर्डानं देऊ केलेल्या 'सेंट्रल कॉंट्रॅक्ट'वर सही करणाऱ्या खेळाडूंनाच येणाऱ्या मोसमाकरिता न्यूझीलंडच्या संघनिवडीसाठी प्राधान्य दिलं जाईल,'

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असू द्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही